**सुधारित आंमत्रण पत्र**

क्रमांक:- आंमत्रण पत्र-२०१५/ प्र. क्र. १४१ / सं. क.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

मंत्रालय विस्तार मुंबई - ४०००३२

विभागातील प्रिंटर्ससाठी नवीन टोनर काट्रेज खरेदी दरपत्रके मागविण्याबाबत

दि. ५ फेब्रुवारी, २०१६

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग (खुद्द) मार्फत विभागातील प्रिंटर्ससाठी एकूण ४४ नवीन टोनर खरेदीसाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. दरपत्रक सादर करावयाचा शेवटचा दि.६ फेब्रुवारी, २०१६ असून दुपारी २:०० वाजेपर्यंत प्राप्त झालेले दरपत्रक त्याच दिवशी दुपारी ४:०० वाजता, संबंधीत दरपत्रक धारकांच्या उपस्थितीत, विभागाच्या खरेदी समिती समोर उघडण्यात येतील. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रक नाकारण्याचा हक्क शासन राखून ठेवत आहे.

| टोनर काट्रेज संबंधी तपशील | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | खरेदी (सन २०१५-१६) | | |
| | प्रिंटर टोनर | Toner No. | अंदाजे संख्या* |
| १ | सॅमसंग टोनर ML३३१०डी | MLT-D२०५S/XIP | ३७ |
| २ | सॅमसंग टोनर ML१६४० | MLT-D२०५S/XIP | २ |
| ३ | सॅमसंग टोनर ML२९५१ NDR | MLT-D१०३L/XIP | २ |
| ४ | सॅमसंग टोनर ML२८५१ ND | ML-D२८५०B/XIP | १ |
| ५ | सॅमसंग एक्सप्रेस M२८७६ ND | MLT-D११६S/XIP | १ |
| ६ | HP PHOTOSMART ६५१० | - | १ |
| | एकूण | | ४४ |

* प्रस्तुत संख्या ही अंदाजित संख्या असून यामध्ये बदल होऊ शकतो.

पुरवठादारांनी फक्त संबंधीत कंपनीने तयार केलेले ओरिजिनल टोनरचाच पुरवठा करावा. शासनाबरोबर ज्या वस्तुच्या पुरवठयाबाबत दर करार करण्यात येईल त्या वस्तुंचा पुरवठा निश्चित झालेल्या दराप्रमाणे १५ दिवसांत शासनास करणे निविदाधारकास बंधनकारक राहील. तसेच माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या दरकरार लागू करण्यात आल्यास त्या दिवसापासून निविदाधारकांबरोबर केलेला (व्यक्ती किंवा कंपनी) दरकरार संपुष्टात येईल व तसे यासंदर्भात आपणांस सूचीत करण्यात येईल. पुरवठादारांनी सोबतच्या प्रपत्र-अ मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून दरपत्रक सादर करावे. उपरोक्त नमुद संगणकीय वस्तू खरेदी इत्यादीबाबतचे दरपत्रक अवर सचिव (संगणक कक्ष), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय विस्तार मुंबई ४०००३२ यांच्या नावाने मोहोरबंद पाकीटातून दि.६ फेब्रुवारी,२०१६ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

(म.गि.जोगदंड)

कार्यासन अधिकारी

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

सोबत:-वरीलप्रमाणे

(प्रपत्र-अ)

अटी व शर्ती

१) मोहोरबंद लिफाफ्यावर "प्रिंटरचे नवीन टोनर काट्रेज पुरवठा करण्याबाबत दरपत्रक" असे लिहिणे आवश्यक आहे.

२) दरपत्रक सादर करावयाचे ठिकाण:- कक्ष अधिकारी (संगणक कक्ष), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, हुतात्मा राजगुरु चौक , मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ येथे दिनांक ६ फेब्रुवारी,२०१६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत जमा करावेत त्यानंतर आलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

३) प्राप्त दरपत्रक दिनांक ६ फेब्रुवारी,२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता अवर सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२ येथे उघडण्यात येतील, दरपत्रक उघडते वेळी पुरवठादार स्वत: किंवा त्यांचा एक प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहु शकतो.

४) दरपत्रकात टोनर काट्रेजचे दर व्हॅट वगळून व व्हॅटसह स्वतंत्रपणे नमुद करावे दरपत्रकामध्ये नमुद करण्यात आलेले दर हे दरपत्रक स्विकृतीनंतर १ वर्षासाठी अस्तित्वात राहतील. सदर करारास आवश्यकतेनुसार १ वर्षाची मुदतवाढ देण्यात येईल.

५) दरपत्रक प्रक्रियेमध्ये सन २०१५-१६ मध्ये ४४ नवीन टोनरची (सॅमसंग-४३, एचपी-१) खरेदी प्रस्तावित आहे. सदर मागणीमध्ये बदल होऊ शकतो.

६) पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर मागणी केलेल्या टोनरचा सुस्थितीत पुरवठा करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. टोनर काट्रेजसंबधी काही बिघाड आढळल्यास सदर साहित्य अंशत: किंवा पुर्णपणे पुरवठादारास परत करण्यात येईल. या परिस्थितीत पुरवठादारास सदर साहित्य, कोणतीही जास्तीचा दर न आकारता बदलून द्यावे लागेल.

७) टोनर काट्रेजचा पुरवठा केल्यानंतर त्यासंबधीचे देयक आगाऊ मुद्रांक पावतीसह सादर करावे. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

८) पुरवठादारांनी आमंत्रणपत्रात उल्लेख केलेले टोनर काट्रेजचा पुरवठा करणे अपेक्षित आहे.

९) टोनर काट्रेजमध्ये खाली नमुद केलेल्या बाबी अंतर्भूत असाव्यात.

- टोनर काट्रेज त्या त्या प्रिंटरसाठी पुर्णपणे लागू असावा.
- टोनर काट्रेज ओरिजीनल कंपनीचाच असावा.

१०) संबंधित कंपनीने उत्पादन केलेल्या टोनरचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत डुप्लीकेट अथवा रिफील केलेल्या टोनरचा पुरवठा करता येणार नाही. टोनरच्या योग्यतेबाबतची पाहणी करण्याचा अधिकार विभाग राखून ठेवत आहे. पुरविण्यात आलेल्या टोनर काट्रेजचे कधीही संबंधीत कंपनी किंवा तृतीय पक्षाकडून परिक्षण केले जाईल. पुरवठादाराचे या प्रक्रियेत पुर्णपणे सहकार्य अपेक्षित आहे.

११) जर टोनर संबंधीत अधिकाऱ्यांकडून अस्विकृत करण्यात आला तर २४ तासात तो बदलुन दिला जावा.

१२) खालील कारणासाठी टोनर अस्विकृत करण्यात येईल.

- टोनर काट्रेज संबंधीत प्रिंटरसाठी अयोग्य असेल
- डुप्लीकेट, रिफील किंवा प्रिंटरसाठी अयोग्य टोनर
- पूर्णपणे किंवा काही प्रमाणात वापरण्यात आलेला टोनर
- टेंडर नोटीसमध्ये अंतर्भूत नसलेले टोनर काट्रेज
- पूर्णपणे पॅक्ड नसलेले टोनर काट्रेज किंवा पॅकेजिंग संदर्भात काही त्रुटी आढळल्यास

१३) दरपत्रक सादर करतांना लिफाफा सिल बंद करुन सादर करावा.

१४) दरपत्रक लिफाफ्यामध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत.

अ) आस्थापना व दुकाने अधिनियम लायसन्स प्रमाणपत्राची प्रत.

ब) दरपत्रक अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य असलेले आयकर भरण्यासंबंधीचे प्रमाणपत्राची प्रत/ तसेच मागील ३ वर्षाची आयकर विवरणपत्रे.

क) पॅनकार्डाची प्रत.

ड) वॅट नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

इ) वॅट भरल्याचे विवरणपत्र.

१५) पुरवठा करण्यात आलेल्या टोनर्समध्ये टोनर उघडल्यापासून २४ तासांत काही दोष आढळल्यास किंवा टोनर Genuine नसल्याचे आढळल्यास नवीन टोनर उपलब्ध करावा लागेल. नवीन टोनर उपलब्ध करण्यास २४ तासांपेक्षा जास्त विलंब झाला तर प्रतीदिन रुपये १००/- चा दंड भरावा लागेल .

१६) दरपत्रकासोबत सदर प्रक्रियेतील खरेदी प्राधिकाऱ्यांबरोबर निविदाकाराचा व त्याच्या संस्थेचा कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही अशी हमी निविदाकारांनी देणे आवश्यक आहे.

१७) कोणतीही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रक नाकारण्याचा हक्क शासन राखून ठेवत आहे.

१८) दरपत्रक सादर करणाऱ्या प्रत्येक पुरवठादाराचे स्वत:चे कायदेशीर अस्तित्व असावे. त्यांच्यात कोणताही हितसंबंधाचा संघर्ष असता कामा नये.

१९) वेगवेगळया दोन किंवा तीन कंपनीकडून दरपत्रक सादर करीत असताना जर या कंपनीचा पुरवठादार एकच असेल तर सदर प्रक्रियेत त्या पुरवठादारास भाग घेता येणार नाही.

२०) प्रत्येक पुरवठादाराने फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

*****************